# शिंदे यांना 'जैन सूर्योदय साहित्य रत्न'

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : येथील शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाचे माजी प्रमुख व साहित्यिक प्रा. डॉ. विश्वनाथ शिंदे यांना नाशिकच्या सूर्योदय सर्वसमावेशक मंडळाच्यावतीने देण्यात येणारा 'भवरलाल जैन सूर्योदय साहित्य रत्न' पुरस्कार जाहीर झाला आहे. एकवीस हजारांचा धनादेश, गौरवपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. यापूर्वी गिरिजा कीर, प्रा. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, प्रा. डॉ. सदानंद मोरे, प्रा. डॉ. किशोर सानप यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.



मंडळाच्या एकोणीसाव्या वर्धापनदिनानिमित्त दलूभाऊ जैन चॅरिटेबल ट्रस्ट प्रायोजित हा पाचवा पुरस्कार आहे. पुरस्कार वितरण जळगावला दि. ८ व ९ जानेवारी २०२२ रोजी सुप्रसिद्ध लेखक प्रा. भास्कर चंदनशिव यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या दोनदिवसीय पहिल्या अखिल भारतीय सूर्योदय मराठी साहित्य संमेलनात होईल. मंडळाचे अध्यक्ष सतीश जैन यांनी ही माहिती दिली.

# शिवाजी विद्यापीठ क्रीडा मंडळावर प्रा. राजेंद्र रायकर यांची निवड

**कसबा बावडा :** डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अ‍ॅण्ड टेक्नालॉजी कसबा बावडाचे क्रीडा संचालक डॉ. राजेंद्र रायकर यांची शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या सदस्यपदी व्यवस्थापन परिषदेचे प्रतिनिधी म्हणून निवड करण्यात आली. या निवडीसाठी डी. वाय. पाटील संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, उपाध्यक्ष व पालकमंत्री सतेज डी. पाटील, विश्वस्त आमदार ऋतुराज पाटील यांचे प्रोत्साहन व शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य संजय जाधव, विद्यापीठाचे शारीरिक शिक्षण अभ्यास मंडळाचे चेअरमन डॉ. बाबासो उलपे यांचे सहकार्य लाभले.



# समाजशास्त्र कार्यशाळेस प्रतिसाद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या बदललेल्या नवीन अभ्यासक्रमावर बी.ए. भाग तीन या वर्गाची समाजशास्त्र विषयाची एकदिवसीय ऑनलाईन कार्यशाळा रयत शिक्षण संस्थेच्या राजर्षी शाहू महाविद्यालयात घेण्यात आली. कार्यशाळेचे उद्‌घाटन प्राचार्य एस. टी. साळुंखे यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

बीजभाषण डॉ. मच्छिंद्र सकटे यांनी केले. यावेळी समन्वयक डॉ. ममता कन्नाडे, भाग्यश्री पुणतांबेकर, सबिया फरास, संजय साठे, अनिकेत जाधव उपस्थित होते.

# प्रा. डॉ. राजेंद्र रायकर यांची निवड

**कोल्हापूर :** डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अॅण्ड



टेक्नॉलॉजी कसबा बावडाचे क्रीडा संचालक डॉ. राजेंद्र रायकर यांची शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या सदस्यपदी व्यवस्थापन परिषदेचे प्रतिनिधी म्हणून निवड करण्यात आली. या निवडीसाठी डी. वाय. पाटील संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, उपाध्यक्ष पालकमंत्री सतेज डी. पाटील, विश्वस्त आमदार ऋतुराज पाटील यांचे प्रोत्साहन व शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य संजय जाधव, शारीरिक शिक्षण अभ्यास मंडळाचे चेअरमन डॉ. बाबासो उलपे यांचे सहकार्य लाभले.

## विद्या परिषदेची मान्यता : २० टक्के अभ्यासक्रम कमी होणार

# १५ फेब्रुवारीपासून महाविद्यालये सुरू




**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोना काळात बंद झालेली महाविद्यालये १५ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहेत. शिवाजी विद्यापीठ विद्या परिषदेने महाविद्यालये सुरू करण्यास मान्यता दिली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार महाविद्यालये सुरू करण्यात येणार आहेत.

शिवाजी विद्यापीठाने प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. समितीने यूजीसी नियमाचा आधार घेऊन आपला अहवाल विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेत मांडला. त्यानंतर तो मंगळवारी विद्या परिषदेच्या बैठकीत सादर करण्यात आला. त्यानंतर विद्या परिषदेने १५ फेब्रुवारीपासून महाविद्यालये सुरू करण्यास मान्यता दिली. महाविद्यालयांना अध्यापनासाठी कमी कालावधीसाठी मिळाला असल्याने २० टक्के अभ्यासक्रम कमी करण्यात येणार आहे. अभ्यासक्रमातील बदलाची माहिती लवकरच महाविद्यालयांना देण्यात येणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली. बैठकीला प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्यासह विद्या परिषद सदस्य उपस्थित होते.

# प्रा. डॉ. राजेंद्र रायकर यांची शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा मंडळावर निवड

**कसबा बावडा :** डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी कसबा बावडाचे क्रीडा संचालक डॉ. राजेंद्र रायकर यांची शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ सदस्यपदी व्यवस्थापन परिषदेचे प्रतिनिधी म्हणून निवड करण्यात आली. या निवडीसाठी डी. वाय. पाटील संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय पाटील, उपाध्यक्ष पालकमंत्री सतेज पाटील, विश्वस्त आ. ऋतुराज पाटील यांचे प्रोत्साहन व शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य संजय जाधव, शिवाजी विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण अभ्यास मंडळाचे चेअरमन डॉ. बाबासो उलपे यांचे सहकार्य लाभले.



# महाविद्यालये सुरू करावीत

## शिवाजी विद्यापीठ विद्या परिषदेची मंजुरी

कोल्हापूर, ता. ९ : लॉकडाउनच्या काळात बंद झालेली महाविद्यालये सुरू करण्यास आज विद्या परिषदेने मान्यता दिली. विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार महाविद्यालये सुरू करावीत, असे बैठकीत निश्चित करण्यात आले. शिवाजी विद्यापीठात ही बैठक झाली.

कोरोनाचा संसर्ग वाढल्याने राज्यातील सर्व महाविद्यालये बंद करण्यात आली. महाविद्यालयांच्या परीक्षाही ऑनलाईन झाल्या. अनलॉक प्रक्रियेत राज्यातील सर्व व्यवहार टप्प्या टप्प्याने सुरू केले. महाविद्यालये सुरू करण्यासंदर्भात राज्य सरकारने स्थानिक पातळीवर निर्णय घेण्यास सांगितले. त्यानुसार शिवाजी विद्यापीठाने प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. महाविद्यालय सुरू होताना कोणती काळजी घ्यावी. याबाबतच्या युजीसीच्या सुचनांनुसार समितीने अहवाल बनवला. हा अहवाल त्यांनी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेमध्ये मांडला. त्यानंतर तो आज झालेल्या विद्या परिषदेच्या बैठकीत सादर करण्यात आला. त्यानंतर विद्या परिषदेने १५ फेब्रुवारी पासून महाविद्यालये सुरू करण्यास मान्यता दिली. युजीसीच्या सुचनेनुसार महाविद्यालये सुरू करण्यात येणार आहेत. यामध्ये महाविद्यालयात ५० टक्के विद्यार्थ्यांची उपस्थिती ठेवावी. महाविद्यालयात एकत्रितपणे होणारे कार्यक्रम टाळावेत. विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी यांनी सॅनिटायझर, मास्क यांचा वापर करणे बंधनकारक आहे. या विद्या परिषदेच्या बैठकीला कुलगुरू डॉ.डी.टी.शिर्के, प्र-कुलगुरू डॉ.पी.एस.पाटील, कुलसचिव डॉ.विलास नांदवडेकर यांच्यासह विद्या परिषद सदस्य उपस्थित होते.

### अभ्यासक्रम ८० टक्के

महाविद्यालयांना अध्यापनासाठी कमी कालावधीसाठी मिळाला असल्याने अभ्यासक्रम कमी करण्यात येणार आहे. पदवी अभ्यासक्रमासाठी ८० टक्के करण्यात येणार आहे. अभ्यासक्रमातील कोणता भाग कमी करायचा याचा निर्णय बोर्ड ऑफ स्टडीज करणार आहेत. याबाबतची माहिती महाविद्यालयांना देण्यात येईल, अशी माहिती कुलगुरूंनी दिली.

10 FEB 2021

# विद्यार्थ्यांत विवेकी विचारांची पेरणी!

## डॉ. कृष्णा पाटील यांचा विशेष शैक्षणिक कार्यक्रम उपयुक्त

» आम्ही कोल्हापुरी...

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ९ : कोविड-१९ मुळे शारीरिक पातळीवर बाधित झालेल्या लोकसंख्येपेक्षा कितीतरी पटीने मानसिक पातळीवर बाधित झालेल्या लोकांची संख्या अधिक असल्याचे दिसते. या दृष्टीने मानसिक आरोग्याचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले. प्रत्येक पाच व्यक्तीमधील एक व्यक्ती ही मानसिक आजाराने त्रस्त असणाऱ्या सध्याच्या परिस्थितीत डॉ. कृष्णा पाटील यांनी विद्यार्थ्यांसाठी विशेष शैक्षणिक कार्यक्रम विकसित केला आहे. त्यांच्या या संशोधनाला यूजीसीकडून मेजर रिसर्च प्रोजेक्ट अंतर्गत स्कॉलरशिप मिळाली आहे.



डॉ. पाटील

वेगवेगळ्या कारणांनी अनेक जण प्रचंड तणावाखाली आहेत. त्यातही विद्यार्थी मोठ्या ताणतणावाच्या परिस्थितीतून जात आहेत. आज भारतात सरासरी प्रत्येक तासाला एक विद्यार्थी आत्महत्या करतो असे संशोधनातून पुढे आले आहे. यातून तणावग्रस्त व मानसिक आजारांना सामोरे जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी असल्याचे दिसते.

डॉ. पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या याच मानसिक आजाराचे कारण व त्यावर प्रभावी उपाय शोधण्यासाठी संशोधन अभ्यास हाती घेतला व प्रतिबंधात्मक असा प्रभावी शैक्षणिक कार्यक्रम विकसित केला. यातून मनातील अविवेकी विचार हे आपलं जगणं दुःखी करतात ते विद्यार्थ्याला कळते.

हे अविवेकी वा अतार्किक विचार काही ठाम मते आणि धारणांमधून आलेले असतात. प्रत्यक्ष परिस्थिती, घटनांपेक्षा त्यांच्याबद्दलचे मनातले विचारच जास्त भीतीदायक असतात. यातील काही अविवेकी समजुतीमुळे मनात राग, द्वेष, खुन्नस अशा भावना निर्माण होतात. त्यांना दूर करून मनात तार्किक व विवेकी विचारांचा विकास करणे या कार्यक्रमामुळे शक्य झाले आहे. डॉ. पाटील शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्रात विभागीय समन्वयक आहेत.

### संशोधनाची वैशिष्ट्ये

- भावनिक साक्षरता विकसित
- विवेकनिष्ठ विचार करायला प्रवृत्त होतात
- भावनिक व मानसिक प्रतिकारक्षमता वाढते
- शैक्षणिक समायोजनाला मदत
- निकोप मानसिक वृत्ती शैक्षणिक यशासाठी मदत करते

# विद्यापीठ कर्मचारी संघ, महावितरणची प्रतिस्पर्धीवर मात

प्रतिनिधी
कोल्हापूर

जिल्हा क्रिकेट असोसिएशन आयोजित टी-२० (क गट) क्रिकेट स्पर्धेअंतर्गत राजाराम कॉलेज येथे सोमवारी झालेल्या सामन्यांमध्ये शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघ व एमएसईबी महावितरण संघांनी विरुद्ध संघांना पराभूत केले.

शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघ व संजीवन कॉलेज यांच्यात पहिला सामना झाला. प्रथम फलदांजी करताना विद्यापीठ संघाने २० षटकांत ६ बाद १३४ धावा केल्या. रमेश ठोणुक्षेने ४४, विश्वनाथ वरूटेने ३८, सागर पोवारने २२ धावा करत संघाला भक्कम स्थितीत नेले. संजीवनच्या सुरज पोवारने २ बळी घेतले. प्रत्युत्तरादाखल खेळताना संजीवन कॉलेजला मात्र २० षटकांचा सामना करूनही ७ गड्यांच्या मोबदल्यात ११९ धावाच न करता आल्यामुळे या संघाचा १५ धावांनी पराभव झाला. निखील सावंतने ३७, सुरज पोवारने २०, शुभम पोवारने १९ धावा करत संघाला पराभवापासून वाचविण्यासाठी केलेले प्रयत्न निष्फळ ठरले. गोलंदाजी करताना योगेश साळवीने ३, शशिकांत दाभाडेने २ बळी घेत शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाला विजय मिळवून दिला.

शाहू स्पोर्टस् ॲकॅडमी (ब) व एमएसईबी महावीतरण संघ यांच्यात दुसरा सामना झाला. या सामन्यात महावितरणने १३५ धावानी विजय मिळवला. फलदांजी करताना एमएसईबीने २० षटकांत ७ बाद १६६ धावा केल्या. रमेश पाटीलने धुव्वाँधार फलंदाजी करत ४६ चेंडूत ८० धावा ठोकल्या. गोलंदाजी करताना शाहू स्पोर्टस्च्या अभिजीत पाटीलने ३, अजिंक्य मगदुमने २ बळी घेतले. शाहू स्पोर्टसूला ११.५ षटकात केवळ ३१ धावांवर गुंडाळून सामना जिंकला. शाहू स्पोर्टसूच्या या संघाला १३५ धावांनी पराभवाच्या छायेत जावे लागले. गोलंदाजी करताना अशोक पहाडने ४, मंगेश पोवारने ३ बळी घेत महावितरणच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.

# शिवाजी विद्यापीठामध्ये अधिसभेच्या कार्यप्रणालीवर कार्यशाळा

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या विकासामध्ये अधिसभा सदस्यांची महत्वपूर्ण भूमिका असते. तेव्हा त्यांनी सर्व घटकांच्या विकासाबरोबर विद्यार्थी हितासाठीही नेहमी आग्रही राहायला हवे, असा सूर शुक्रवारी शिवाजी विद्यापीठामध्ये अधिसभा सदस्यांसाठी आयोजित केलेल्या 'अधिसभेची कार्यप्रणाली" या विषयावरील कार्यशाळेत उमटला.

शिवाजी विद्यापीठाच्या ॲकॅडमी ऑफ ॲकॅडॅमिक ॲडमिनिस्ट्रेशनने (एएए) कार्यशाळा आयोजित केली होती. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के हे होते.

कार्यशाळेत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील



यांनी अधिसभेच्या सदस्यांना मार्गदर्शन केले. प्रारंभी नाशिकच्या यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ.कुलकर्णी म्हणाले, माजी विद्यार्थी हा विद्यापीठाचा महत्त्वाचा घटक असतो. पण त्यांच्याकडे दुर्लक्ष होते. नवीन शिष्यवृत्ती सुरू करण्यासाठी, जुन्या शिष्यवृत्तींची रकमा वाढविण्यासाठीही माजी विद्यार्थीचे सहकार्य घ्यावे.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विविध प्रश्न मांडण्यासाठी अधिसभेच्या बैठकीची वाट न पाहता विद्यापीठाचे कुलगुरूंशी पत्रव्यवहार करावा. माजी कुलसचिव डॉ. राजेंद्र कांकरिया म्हणाले, विद्यार्थ्यांचे प्रश्न व समस्यांचीही मांडणी करून त्यांच्या सोडवणुकीला जास्ती प्राधान्य द्यावे लागेल.यावेळी अधिसभा सदस्यांच्या विविध शंकांचे निरसन करण्यात आले. तत्पूर्वी, डॉ. ए.पी. कुलकर्णी यांनी 'अधिसभा बैठकीच्या माध्यमातून योगदान कसे द्यावे", डॉ. राजेंद्र कांकरिया यांनी 'अधिसभा कार्यप्रणालीचे परिनियम" आणि डॉ. बी.एम. हिर्डेकर यांनी 'अधिसभेतील प्रश्न" या विषयांवर तीन तांत्रिक सत्रांत मार्गदर्शन केले. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील उपस्थित होते. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, डॉ. एस.टी. कोंबडे यांनी आभार मानले.

# महाविद्यालय सुरु करण्यास विद्या परिषदेची परवानगी

## व्यवस्थापन परिषदेची आज बैठक : आता महाविद्यालयाचे संलग्नीकरण दर तीन वर्षांनी होणार

प्रतिनिधी
कोल्हापूर

शासन आदेशानुसार १५ फेब्रुवारीपासून महाविद्यालये सुरु करण्यासाठी मंगळवारी विद्या परिषदेने मान्यता दिली. विद्या परिषदेने या ठरावाची शिफारस व्यवस्थापन परिषदेला केली आहे. राज्य शासन आणि विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी) यांच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे बंधनकारक असल्याचा निर्णय घेण्यात आला. व्यवस्थापन परिषदेची आज (दि. १०) बैठक होणार असून या बैठकीत महाविद्यालये सुरू करण्यासंदर्भात अंतिम निर्णय घेतला जाणार आहे.

महाविद्यालय संलग्नीकरण दरवर्षी न करता तीन वर्षानंतर करा, अशी प्राचार्य असोशिएशनने केलेल्या मागणीस



विद्यापरिषदेने मान्यता दिली आहे. यंदा एकच परीक्षा घेण्याची मागणी केली असता यासंदर्भात विद्यापीठ परीक्षा विभागाने कमिटी तयार केली आहे, या कमिटीची बैठक १२ फेब्रीवारीला होणार असून ही कमिटी निर्णय घेईल, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी विद्या परिषदेच्या सदस्यांना सांगितले.

अभ्यासक्रम किती कमी करायचा, कमी करायचा का नाही यासंदर्भात मात्र अभ्यास मंडळ निर्णय घेईल. त्यामुळे अभ्यासक्रम कमी होणार का नाही याकडे महाविद्यालयाचे लक्ष लागले आहे. मंगळवारी झालेल्या विद्या परिषदेच्या बैठकीला २५ सदस्य उपस्थित होते. व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेवून १५ फेब्रुवारीपासून महाविद्यालये सुरु करण्यासंदर्भात विद्यापीठ महाविद्यालयांना परिपत्रकाव्दारे सूचना देणार आहे.

**सीएचबी प्राध्यापकांच्या नियुक्तीसंदर्भात उद्या निर्णय**

महाविद्यालये सुरू केली तर अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी गतवर्षीच्या मान्यतेप्रमाणे सीएचबी प्राध्यापकांची नियुक्ती करावी, अशी मागणी प्राचार्य असोसिएशन आणि सीएचबी प्राध्यापकांकडून होत आहे. या मागणीचा ठराव विद्यापीठ प्रशासनाने राज्य शासनाला पाठवला आहे. गुरुवारी ११ रोजी उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांच्याबरोबर प्राचार्य असोसिएशनची बैठक होणार आहे. या बैठकीत गतवर्षीच्या सीएचबी प्राध्यापकांच्या नियुक्तीसंदर्भात निर्णय होण्याची शक्यता आहे.

कॉलेज सुरु करण्यासंदर्भात महाविद्यालयाकडून युद्ध पातळीवर तयारी शासनासह युजीसीच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे विद्यार्थ्यांनी वर्गात येताना मास्क घालणे बंधनकारक आहे. त्यामुळे गेटवर विद्यार्थ्यांना सॅनिटायझर देवून, स्क्रिनिंग तपासणी, विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने महाविद्यालयाच्या वर्गखोल्या, वसतिगृहांची स्वच्छता आणि सॅनिटायझेशन करण्याचे काम सुरू आहे.

# पदवी विषयांसाठी ८० टक्के अभ्यासक्रम

## शिवाजी विद्यापीठाचा निर्णय : महाविद्यालये सुरू करणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : कोरोनामुळे महाविद्यालयांना विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी कमी कालावधी मिळाला आहे. त्यामुळे पदवीच्या विविध विषयांचा अभ्यासक्रम २० टक्क्यांनी कमी केला जाणार आहे. ८० टक्के अभ्यासक्रमावर यंदाच्या परीक्षा असतील. कोणता अभ्यासक्रम कमी करण्यात येणार आहे, त्याबाबतची माहिती शिवाजी विद्यापीठाकडून कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील संलग्नित महाविद्यालयांना लवकरच देण्यात येईल, असे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी मंगळवारी सांगितले.

कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखांतील विविध पदव्यांच्या विषयांचा अभ्यासक्रम कमी करण्याचा निर्णय अभ्यासमंडळाकडून घेण्यात येणार आहे. राज्य शासनाने दि. १५ फेब्रुवारीपासून महाविद्यालये सुरू करण्याची सूचना दिली आहे. त्याबाबत विविध अधिविभाग आणि कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील महाविद्यालये कशी सुरू करावयाची, वर्ग कोणत्या पद्धतीने भरवायचे, विविध अभ्यासक्रम आणि परीक्षांचे वेळापत्रक स्वरूपाचे कसे राहणार याबाबतचा सविस्तर अहवाल प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे समितीने तयार केला. या अहवालाला विद्या परिषदेने मंगळवारी मान्यता दिली. शासन आदेशानुसार महाविद्यालये सुरू करण्यासही मान्यता दिली. विद्या परिषदेने शिफारस केलेला हा अहवाल आज, बुधवारी व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवण्यात येणार असल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. विद्या परिषदेच्या बैठकीस प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, आदी उपस्थित होते.



### ५० टक्के उपस्थिती

महाविद्यालयात ५० टक्के विद्यार्थ्यांची उपस्थिती असावी. गर्दी होणारे कार्यक्रम घेण्यात येऊ नयेत. विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी यांनी मास्क, सॅनिटायझर, सोशल डिस्टन्सिंगचे पालन करणे, आदी मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करावे लागणार आहे.

# स्तनांच्या कर्करोगावरील औषधाच्या संशोधनास पेटंट

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** स्तनांच्या कर्करोगाबाबत सर्वसामान्य पेशींना अपाय न करता केवळ कर्करोगाच्या पेशींना लक्ष्य करणाऱ्या औषधाविषयी यशस्वी संशोधन केले असून त्याचे भारतीय पेटंट येथील दोघा शास्त्रज्ञांना प्राप्त झाले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील संशोधक डॉ. गजानन राशिनकर आणि त्यांचे विद्यार्थी डॉ. प्रकाश बनसोडे यांनी ही कामगिरी केली असल्याचे सांगण्यात आले.

भारतात महिलांमधील स्तनांच्या कर्करोगाचे प्रमाण खूप वाढले आहे. स्तनांचा कर्करोग हा जटिल आजार आहे. याच्या उपचार पद्धतींमध्ये रुग्णाला उपचारा दरम्यान होणाऱ्या दुष्परिणामांना (साईड इफेक्ट्स) सामोरे जावे लागते. तसेच कर्करोगावरील औषधांमध्ये आढळणाऱ्या प्रतिरोधामुळे (ड्रग रेजिस्टन्स) सातत्याने नवनवीन संशोधनातून विकसित केलेल्या औषधांची गरज भासत असते. रसायनशास्त्र अधिविभागामध्ये यासंदर्भात संशोधन झाले असून त्यास पेटंट प्राप्त झाले आहे.

## संशोधन असे

रुग्णांना 'केमोथेरपी' उपचारांदरम्यान या औषधांच्या दुष्परिणामांना सामोरे जावे लागते. स्तनांच्या कर्करोगावर उपयुक्त 'टॅमॉक्सीफेन' या औषधाचे दुष्परिणाम कमी करण्यासाठी व उपचाराची उपयुक्तता वाढविण्यासाठी 'फेरोसीन' हा घटक वापरून 'फेरोसीफेन' हे उपयुक्त औषध तयार करण्यात संशोधकांना यश आले आहे. फेरोसिन हा घटक मानवी शरीरास अपायकारक नाही, हे या संशोधनातून सिद्ध झाले आहे. या चाचणीच्या अहवालात असे आढळून आले, की ही संयुगे कर्करोगाच्या पेशींना पूर्णपणे नष्ट करतात; परंतु शरीरातील सामान्य पेशींना मात्र अपाय करीत नाहीत, इतकी ती सुरक्षित आहेत.

10 FEB 2021

# ‘गजनृत्य’, ‘सुंबरानं’चा लोककलेला साज

## पारंपरिक धनगरी नृत्य; पौराणिक व लोककथांवर आधारित गीते

» जागर लोककलांचा भाग - ३

संदीप खांडेकर :
सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ९ : गजी (गजनृत्य) व सुंबरानं धनगरांचे पारंपरिक विधिनाट्य. बिरोबा त्यांचे प्रमुख दैवत. दोन्ही लोककला राज्यात प्रसिद्ध असल्या तरी त्यातील गजी नृत्याच्या सादरीकरणात वैविध्य आहे.

सुंबरानंमध्ये सुरवंतीच्या लोककथेला अधिक महत्त्व आहे. धोतर, डोक्यावर टोपी, हातात रंगबेरंगी रुमाल घेऊन नर्तक सुंबरानचे सादरीकरण करतात. गजीमध्ये मात्र वेशभूषेत भेद आढळतात. विशेष म्हणजे अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे गुजरातमध्ये स्वागत करण्यासाठी आरेवाडीच्या गजी नृत्याला आमंत्रित केले होते. शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभागाचे प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांनी गजी व सुंबरानबाबत अधिक माहिती घेण्यासाठी ठिकठिकाणी भेटी दिल्या. तेव्हा दोन्ही लोककलांतील वैविध्य त्यांच्यासमोर आले.



संग्रहित छायाचित्र

धनगर समाज माळरान व डोंगर कपाऱ्यात भटकणारा समाज आहे. मेंढ्या, बकऱ्या, गाई व म्हशी यांचे पालन करून चरितार्थ चालविण्याची त्यांची जीवनशैली आहे. गजी नृत्य प्रकारात मानदेश, सांगली व कोल्हापूर जिल्ह्यात विविधांगी पदर आहेत. धनगर समाजातील सुशिक्षित लोक नोकरीच्या निमित्ताने पुणे, मुंबईत स्थायिक झाले असले तरी गजीसाठी दसऱ्याला आपापल्या गावी परततात. ही कला टिकविण्याची त्यांची धडपड आहे. सुंबरान हा त्यांचा परंपरेने चालत आलेला कलाप्रकार आहे. त्यात ढोलच्या ठेक्यावर नृत्य केले जाते. बिरोबासह मंगोबा, धुळोबा, भिऊबाई या दैवतांची उपासना त्याद्वारे केली जाते. पौराणिक व लोककथांवर आधारित गीते सुंबरानमध्ये म्हटली जातात. ही गीते प्रदीर्घ स्वरूपाची असतात. विशेषतः त्यात श्रावणबाळ, राजा हरिश्चंद्र, बिरोबा देव, सुरवंतीची कथागीते गायली जातात.

**वैशिष्ट्ये...**

- इस्लामपूरच्या युवकांकडून सुंबरानचे ठिकठिकाणी कार्यक्रम
- सुंबरानमध्ये ओवी गाताना भंडाऱ्याची उधळण
- ढोल, कैताळ, टिपरुक, पावा, दिमडी यातील महत्त्वाची वाद्ये